प्रेसनोट दि.०९/०३/२०१९

## सिंहगडरोड पो.ठाणे

## महिला दिनानिमीत्त सिंहगड कॉलेज मधील विदयार्थीनींना गुलाब पुष्पाचे वाटप

दि.०८/०३/२०१९ रोजी महिला दिनानिमीत्त सिंहगडरोड पोलीस ठाण्याचे वडगाव पोलीस चौकीचे सहा.पोलीस निरीक्षक बी.डी.साळुंखे, महिला पोलीस उप-निरीक्षक ए.टी. गायकवाड मपोशि ९५५९ डी.आर.होळकर, मपोशि ९२७२ व्ही.एस.आखाडे व मपोशि ९५१९ पी.पी.शिर्के यांनी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन सिंहगड कॉलेज मधील विदयार्थीनींना महिलांच्या हक्काबाबत व सुरक्षिततेबाबतची जाणीव करुन देवुन त्यांना कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने महिला, मुली यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन काही अडचण आल्यास १०० नंबर वर कॉल केल्यास ५ ते १० मिनीटात दामिणी पथक, बिट मार्शल हे उपलब्ध होतात याबाबत मार्गदर्शन केले. तसेच महिला दिनानिमीत्त सदर विदयार्थीनींना गुलाब पुष्पांचे वाटप करुन त्यांना महिला दिनाच्या शुभेच्या देण्यात आल्या. सदर वेळी १०० ते १२५ विदयार्थीनीं हजर होत्या.

